आर.सी.सी क्र. ६३८/२०१४
सरकार विरुध्द प्रतापराव घारे
**निशाणी क्र.६७/ क**

**अभियोग पक्षा तर्फे साक्षीदार क्रमांक–२ यांची जबानी–**
मी प्रतिज्ञापुर्वक शपथेवर निवेदन करतो की,
**माझे नाव – श्री. कुंडलीक विठ्ठलराव सोनवणे,**
वय –५५ वर्षे, व्यवसाय – शेती,
निवासस्थान– गट नं.२१७, सातारा परिसर, औरंगाबाद.

---

**<u>सरतपासणी अभियोग पक्षा करीता</u>**
**<u>विद्वान श्री. सक्री व्ही. पी., सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांचे द्वारा –</u>**

**१**. मी आरोपींना ओळखतो. आज रोजी आरोपी हे गैरहजर आहेत. माझी शेत जमीन गट नं.२१७, सातारा परिसर येथे आहे. माझी पुर्वी एकूण २६ एकर शेती होती, तेवढी आता नाही. माझ्या आजोबाच्या नावे ही जमीन होती. माझ्या आजोबांचे नाव खंडोबा कुशाबा सोनवणे असे होते. माझ्या आजोबांना माझ्या वडीलांसह एकूण चार मुले होती. यामध्ये तीन चुलते होते. सन–१९८५ साली प्रतापराव रामराव घारे यांना ११ एकर १५ गुंठे एवढी जमीन विकली होती. ही जमीन त्यांना माझे वडील आणि काका यांनी विकली होती. त्याप्रमाणे त्या खरेदीची नोंद सातबा–याला झाली होती. सन–१९८५ साली झालेले खरेदीखताची सत्यप्रत मला आता दाखविली. ती हीच आहे. या खरेदीखताला **<u>निशाणी क्रमांक ६८</u>** देण्यात येत आहे. याव्यतिरिक्त आमच्या कुटुंबाचा आरोपींसोबत कोणताही व्यवहार झालेला नव्हता.

**२**. सन–१९९५ साली आरोपी प्रतापराव घारे व प्रविण मोहीते यांनी संगणमत करून गट नं.२१७ चे खोटे खरेदीखत करून घेतले. त्यांनी हे दोन एकराचे खोटे खरेदीखत केले होते. हे गट क्र.२१७ मधील जमीनीचे होते. या खरेदीखतामध्ये आमच्या काकाचे श्री. उमाजी खंडुजी सोनवणे, श्री. वामन खंडुजी सोनवणे आणि चुलत भाऊ श्री. शिवाजी गणपत सोनवणे व माझे नाव दर्शवून खोटे खरेदीखत केले होते. ही खरेदी आम्ही स्वतःहुन वैयक्तीक किंवा माझे चुलत भाऊ अथवा चुलते यांनी कधीही प्रताप घारे यांना दिलेली नव्हती. या खरेदीखताची सत्यप्रत मला आता दाखविली. ती हीच आहे. या खरेदीखताला **<u>निशाणी क्रमांक ६९</u>** देण्यात येत आहे. या खरेदीखतावर मी किंवा माझे चुलते अथवा चुलत भाऊ यांच्या सह्या नाहीत. हे <u>निशाणी क्र.६९</u> चे खरेदीखत हे बोगस आहे. या खरेदीखताच्या आधारे सातबा–यास नोंद झाली नाही. या खरेदीखताच्या प्रमाणे आरोपींच्या नावाची नोंद झाली नाही. माझे हे चुलते व चुलत भाऊ आज रोजी हयात नाहीत. ह्या <u>नि.क्र.६९</u> खरेदीखतावरील क्रमांक–४ वर सही, निशाणी अंगठा माझा नाही. या खरेदीखतामधील मजकुर मी कधीही सांगीतलेला नव्हता.

**३**. मला आता फोटो दाखविले. हे आमच्याच जागेचे आहेत. या फोटोंना **आर्टीकल क्रमांक–ए,ब,क** देण्यात येत आहेत. सन१९९५ साली आरोपींनी खोटे खरेदीखत केले. आमच्यामध्ये व आरोपींमध्ये कोणताही व्यवहार झालेला नव्हता. यामध्ये खरेदी देणार इसम म्हणून मी स्वतः

नव्हतो. गट क्र.२१७ मधील उत्तरेकडील भाग हा वडीलोपार्जित होता व तो वारसाप्रमाणे मिळालेला होता. या बोगस खरेदीखतामुळे माझी फसवणूक झालेली आहे. या खरेदीखतावरील इसम हे माझ्या माहीतीतील नव्हते. माझी फसवणूक झाली म्हणून मी व आम्ही सर्व भावांनी मिळून पोलीस ठाणे सातारा येथे तक्रार दिली होती. मला आता पोलीस ठाण्यात दिलेली तक्रार दाखविली. यावर माझी सही नाही, परंतू यावर माझ्या भावांच्या सह्या आहेत. गट क्र.२१७ मधील उत्तरेकडी भाग हा माझे भाऊ शंकर गणपत सोनवणे व नामदेव सोनवणे, किशोर सोनवणे यांच्याकडे न्यायालयाच्या आदेशानुसार आला. हा भाग त्यांनी श्री. आशीष झवर यांना विक्री केला. श्री. आशीष झवर यांची सातबारावर नोंद झाली. गट क्र.२१७ च्या बाबतीत श्री. आशीष झवर यांच्या कोर्ट वादात ह्या खरेदीखताची आम्हाला माहीती झाली. त्यामुळेच तक्रारी अर्ज माझे भाऊ शंकर सोनवणे, नामदेव सोनवणे व किशोर सोनवणे यांनी दाखल केला होता.

४. त्यानंतर मग मी आरोपींविरुध्द सातारा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती. मला आता ही फिर्याद दाखविली. यावर माझी सही आहे. यामधील मजकुर खरा व बरोबर आहे. या फिर्यादला **निशाणी क्रमांक ७०** देण्यात येत आहे. मला प्रथम खबर अहवाल आता दाखविली. यावरसुध्दा माझी सही आहे. यामधील मजकुर खरा व बरोबर असून या प्रथम खबर अहवालास **निशाणी क्रमांक ७१** देण्यात येत आहे.

**सरतपास– संपला.**

**आरोपीच्या वकीलांचा उलटतपास तहकुबीचा अर्ज निशाणी क्र. ७२ वरील आदेशावरून उलटतपास पुढील तारखे पर्यंत तहकुब.**

समक्ष
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद
दिनांक– ११/१२/२०२५.

श्रवणोत्तर स्वीकृती.
**–/स्वाक्षरीत/–**
( श्री. आर. एस. जांबोटकर )
मुख्य न्यायदंडाधिकारी, औरंगाबाद